निविदा नमुना

निविदा मागविणा–या कार्यालयाचे नांव :– जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद

कामाचे स्वरूप :– विशेष जलदगती न्यायालय, उस्मानाबाद यांचे न्यायालयामध्ये चतुर्थ श्रेणी संवर्गातील शिपाई पदाची कामे करून घेणेसाठी एकुण दोन शिपाई शासनमान्य कंत्राटदारामार्फत (आउटसोर्सींग) ने नेमुण त्यांचेकडुन शिपाई या पदाची कर्तव्य करून घेणे.

निविदा कमांक :–

कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचे नांव :–

कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा संपूर्ण पत्ता :–

कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा संपर्क दुरध्वनी :–

कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा नोंदणी कमांक :–

कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा सेवा कर क. :–

प्रपत्र–1

अ. क	कामाचे स्वरूप	मागणी करण्यांत आलेली कर्मचारी संख्या	मागणी केलेल्या पदासाठी कंत्राटी सेवा पुरवण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण रक्कम (वार्षिक खर्च)	साधन सामुग्री खर्च (असल्यास) (रूपये) (वार्षिक खर्च)	सेवा कर (वार्षिक खर्च)	एकूण रक्कम (रूपये) (स्तंभ 4+5+6)	एकूण रक्कम (रूपये) अक्षरी.
1	2	3	4	5	6	7	8
1	शिपाई	2					

निविदेची एकुण रक्कम रूपये /–(अक्षरी रूपये)

प्रपत्र–2

कत्रांटदाराकडून मागणी करण्यांत आलेला अतिकालीक भत्ता

अ.क.	पद	अतिकालीक भत्याची रक्कम (प्रतितास)
1	2	3
1	शिपाई	

नांव :–
पत्ता :–
दुरध्वनी कं :–

सही
मोबाईल कं.

कंत्राटदारांसाठी विशेष सूचना

1) प्रपत्र 1 मधील स्तंभ कं.4 ते 8 मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

2) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

3) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे सेवा कराच्या प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यांत येईल.

4) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने मागील तीन वर्षाच्या आयकर प्रमाणपत्रांची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

5) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने पॅनकार्डची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

6) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने निविदेसोबत," निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या सुचनेनुसार निविदा भरली आहे " अशा आशयाचे हमीपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

7) कंत्राटदाराने /संस्थेने/कंपनीने निविदेसोबत, मागील कालावधीत घेतलेले कंत्राटी बाह्ययंत्रणेमध्ये नेमणूक केलेल्या कामगाराचा E.P.F. भरणा केलेली 3 महिन्याचे स्टेटमेंट सादर करणे आवश्यक आहे.

8) या कार्यालयास सादर करावयाची सर्व माहिती ही .pdf format मध्ये सादर करावी.

विवरणपत्र परिशिष्ट–अ (तांत्रिक लिफाफा)

1. ई–निविदा कंत्राटदाराचे / संस्थेचे / कंपनीचे नांव :–

2. ई– निविदाकाराकडे सदर कामाचा पूर्वीचा अनुभव :–
आहे काय? सध्या कोणकोणत्या संस्थेत काम चालु
आहे त्याचा संपूर्ण तपशिल.

2. ई– निविदाकाराकडे सदर कामाचा पूर्वीचा अनुभव :–
आहे काय? सध्या कोणकोणत्या संस्थेत काम चालु
आहे त्याचा संपूर्ण तपशिल.

3. ई–निविदाकाराने स्वतःवर कोणताही गुन्हा दाखल :–
नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही
प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे
प्रतिज्ञापत्र दाखल करावे.

4. ई–निविदाकाराने खालील बाबींची पूर्तता केली आहे :–
काय ?

5. ए) कंपनी/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.

बी) कंपनी/संस्थेचे सेवा कराच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.

सी) कंपनी/संस्थेचे मागील तीन वर्षाच्या आयकर प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती.

डी) कंपनी/संस्थेचे पॅन कार्डची छायांकीत प्रत.

ई) कंपनी/संस्थेचे राष्ट्रीयकृत बॅकेत बचत खाते किंवा चालु खाते
असल्याबाबतच्या सर्व कागदपत्रांची छायांकीत प्रत.

ठिकाण :– उस्मानाबाद.
दिनांक :– / /2025

ई–निविदाकाराचे/कंत्राटदाराचे नांव शिक्का व स्वाक्षरी.

जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद.

(जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद ई मेल – mahosmdc@mhstate.nic.in)
(Phone (02472) 224733)

चतुर्थ श्रेणीची पदे कंत्राटदारामार्फत (आउटसोर्सींग) ने भरणेसाठीची निविदा

ज्या न्यायालयात काम करावयाचे आहे त्या न्यायालयाचे नांव :– विशेष जलदगती न्यायालय, उस्मानाबाद यांचे न्यायालय

विशेष जलदगती न्यायालय, उस्मानाबाद यांचे न्यायालयामध्ये चतुर्थ श्रेणी संवर्गातील शिपाई पदाची कामे करून घेणेसाठी दोन शिपाई शासनमान्य कंत्राटदारामार्फत (आउटसोर्सींग) ने नेमुण त्यांचेकडुन शिपाई या पदाची कर्तव्य करून घ्यावयाचे आहेत.

पदांच्या कामाचे स्वरूप

शिपाई यांची कर्तव्य ही न्यायालयातील कक्षामधील स्वच्छता राखणे, शाखेमधील संचिकांची न्यायालय अंतर्गत ने आण करणे, विधीज्ञ व पक्षकार यांना पुकारा करणे व वरिष्ठांनी सोपविलेली वर्ग–4 कर्मचा–यांची कर्तव्य पार पाडावी लागतील.

शिपाई या पदाची कर्तव्य पार पाडण्यासाठी विशेष जलदगती न्यायालय, उस्मानाबाद यांचे न्यायालयामध्ये चतुर्थ श्रेणी संवर्गातील शिपाई पदाची कामे करून घेणेसाठी एकुण दोन शिपाई शासनमान्य कंत्राटदारामार्फत (आउटसोर्सींग) ने नेमणुक करावयाचे आहे. त्यासाठी खालील अटी / शर्तीवर शासनमान्य कंत्राटदारामार्फत ई–निविदा प्रणालीद्वारे पात्र निविदा धारकाकडुन ऑनलाईन निविदा मागविण्यांत येत आहेत.

सदर ई–निविदा प्रसिध्दीचा दिनांक. 25/11/2025 वेळ सकाळी 11.00 वाजता, ई–निविदा कागदपत्रे उपलब्ध सुरुवातीचा दिनांक व वेळ दिनांक. 25/11/2025 वेळ सकाळी 11.00 वाजता, ई–निविदा सादर करण्यासाठीची सुरुवातीचा दिनांक. 01/12/2025 वेळ सकाळी 11.00 वाजता, ई–निविदा विक्रीचा शेवटचा दिनांक. 09/12/2025 सायंकाळी 18.55 वाजेपर्यंत, ई–निविदा सादर करण्याचा शेवटचा दिनांक. 09/12/2025 सायंकाळी 18.55 वाजेपर्यत, तांत्रिक लिफाफा ई–निविदा उघडण्याचा दिनांक. 12/12/2025 वेळ दुपारी 14.00 वाजता. जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद. येथे निविदा स्विकृत करण्यांत येईल.

सदर कामाची ई–निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार शासन/सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

सदर निविदा **https://districts.ecourts.gov.in/osmanabad** या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

पदाचे नांव	शिपाई
संख्या	2

अटी व शर्ती

1) ई–निविदा सुचनेमध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार ई–निविदा पुस्तिका फॉर्म खरेदी/डाऊनलोड/बिड भरणे/बिड समाविष्ट करणे/सेवा शुल्क जमा करणे/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रकिया विहीत वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. याची ई–निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

2) ई–निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. (तांत्रिक व व्यापारी) व्यापारी निविदा नमुना प्रपत्र 1 विहीत नमुन्यातच असावी.

3) निविदा नमुना प्रपत्र–1 मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

4) तत्सम स्वरुपांचे काम करण्याचा कमीत कमी 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

5) कंत्राटदारांनी/संस्थेनी/कंपनींनी निविदा प्रकियेसाठी निविदा अर्ज सादर करतांना त्यांचे कंपनीचे/संस्थेचे, नोंदणी प्रमाणपत्र/सेवा कराचे प्रमाणपत्र/मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र/पॅनकार्ड/ई.एस.आय.सी.प्रमाणपत्र /पी.एफ.प्रमाणपत्र/प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सादर केलेल्या निविदा उघडतेवेळी संबंधित निविदाकारांनी उपरोक्त प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती तांत्रिक निविदेसोबत न जोडल्यास तसेच मुळ प्रती तपासणीसाठी सादर न केल्यास त्यांचे निविदा अर्ज निविदा प्रकियेतून बाद ठरविण्यात येईल.

6) खाजगी कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणा–या कंत्राटी कर्मचा–यांची नांवे, त्यांचा पत्ता व त्यांच्या चारित्र्याविषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करतील.

7) सदर कामाकरिता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एका महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यांत येईल.

8) कर्मचा–यांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील.

9) कंत्राटदार यांनी नेमणूक केलेले कर्मचारी हे सर्व एकसारख्या गणवेशात असावेत.

10) कंत्राटदार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवुन त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचे हस्तक्षेप होणार नाही याबाबत दक्षता घेतील.

11) कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा–यांकडुन वक्तशीरपणे व नियमितपणे या कार्यालयातील कामे करवून घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायित्व हे या कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचा राहील.

12) कंत्राटदाराकडून नेमलेल्या कंत्राटी कर्मचा–यांकडुन सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळुन आल्यास कंत्राटदार यांना देय असलेल्या रकमेतून सदर रक्कम वसूल करण्यांत येईल.

13) कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयातील तरतूदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतूदीप्रमाणे कारवाई करण्यांत येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्याचे नांव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

14) कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्यानुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरूपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावे Account Payee cross cheque द्वारेच (रेखांकित धनादेशाद्वारेच) अदा करावेत किंवा त्यांच्या बॅंक खात्यामध्ये जमा करुन वेतनाचा तपशील प्रत्येक महिन्याला सादर करण्यात यावा.

15) कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत, सदर चेक स्विकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश कमांक लिहिलेला असेल) कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयास सादर करावे लागतील. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यांत येणार नाही.

16) कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत तीन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही.

17) किमान वेतन कायदयातील तरतूदीनुसार, कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीच्या दिवशी कार्यालयास कंत्राटी कामगारांच्या सेवेची आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

18) सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडुन काम करून घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी मात्र अशी बदली रजा देताना त्या दिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नये म्हणून दुस–या कर्मचा–याची सोय करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

19) शासकीय वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीक भत्ता (ओव्हर टाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

20) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचा–यांना कार्यालयात हजर होताना व कार्यालय सोडताना हजेरीपटावर त्याची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल, सदर नोंदणीसाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे.

21) कंत्राटदारास त्याने नेमलेल्या कंत्राटी शिपाई यांना किमान वेतन अधिनियम, 1948 मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते, सवलती व सेवाशर्ती लागु करणे बंधनकारक असेल.

22) ज्या कंपनीस / संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्याबाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

23) सदरील निविदेस शासनाकडुन प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर अंमलात येईल.

24) कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा–या वरील सेवा / सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

25) कंत्राटदाराने अतिकालीक भत्त्याचा खर्च (Over-time) वेगळा दाखवावा. दर तासाला किती अतिकालीक भत्याची मागणी करणार आहे त्याबाबत कंत्राटदाराने लेखी कळवावे.

26) कंत्राटदाराने नमुद केलेली वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्त्याची रक्कम किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी नसावी.

27) न्यायालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणा–या सोई–सुविधा / काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे त्या अनुषंगाने लागु असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

28) कंत्राटदारास {1} विधी व न्याय विभाग शासन निर्णय कंमांक पदनि 2512/प्र.क 157/का.12, मंत्रालय, मुंबई दिनांक 26 फेब्रुवारी, 2013 {2} विधी व न्याय विभाग शासन निर्णय कंमांक पदनि 2512/प्र.क 157/का.12, मंत्रालय, मुंबई दिनांक 27 फेब्रुवारी, 2013 {3} विधी व न्याय विभाग शासन निर्णय कंमांक पदनि 2512/प्र.क 157/का.12, मंत्रालय, मुंबई दिनांक 06 मार्च, 2013 {4} विधी व न्याय विभाग शासन निर्णय कंमांक पदनि 2512/प्र.क 157/का.12, मंत्रालय, मुंबई दिनांक 23 एप्रिल, 2013 {5} विधी व न्याय विभाग शासन निर्णय कंमांक पदनि 2512/प्र.क 157/का.12, मंत्रालय, मुंबई दिनांक 27/01/2015 मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

29) उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यांत येणार आहे, त्यांना नियमीत कर्मचा–याप्रमाणे नियम, अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमीत कर्मचा–यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगीक लाभ अनुज्ञेय / लागू राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे न्यायालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

30) कंत्राटदाराने शासन मान्य कंत्राटदार असले बाबत, आयकर रिटर्न भरले बाबत, पॅन कार्ड, आधार कार्ड, रहिवासाचा पत्ता, मागील तीन वर्षाच्या आयकर प्रमाणपत्राची साक्षांकिंत छायाप्रत, कंत्राटदाराने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायाकिंत प्रत, इ. बाबतचे कागदपत्रे निवेदे सोबत दाखल करावीत. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्य ठरविण्यांत येईल.

31) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे सेवा कराच्या प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्य ठरविण्यांत येईल.

32) कंत्राटदाराने बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त केलेल्या कर्मचारी /कामगार यांना सामाजिक सुरक्षाअंतर्गत फायदे तसेच ईपीएफ आणि एम.पी. ॲक्ट 1952 अंतर्गत असलेले फायदे नियमाप्रमाणे देणे बंधनकारक राहील. तसेच E.P.F. ची रक्कम भरणा केल्याची यादी प्रत्येक महिन्याला सादर करणे बंधनकारक राहील.

33) सर्व ई–निविदा या जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.

34) केवळ ई–निविदा किंवा अनामत रक्कम जमा केली म्हणून कंत्राटदारास हक्क सांगता येणार नाही.

35) कंत्राटदार यांना कंत्राटी दरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तीचे पालन करीन असे हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

36) निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क न्यायालयाने/शासनाने राखून ठेवला आहे.

37) प्राप्त झालेल्या निविदांमधून सर्व अटी व शर्तीचे/शासनाने वेळोवेळी प्रस्तुत केलेले शासन निर्णय /ज्ञापन/परिपत्रके यांचे पालन करुन पात्र ठरलेल्या निविदांमधील न्युनतम किंमतीची निविदा स्विकृत करण्यांत येईल व प्राप्त झालेल्या सर्व निविदा मंजूरी प्रस्तावासह मा.उच्च न्यायालयामार्फत प्रशासकीय मान्यतेस्तव शासनाकडे सादर करण्यांत येईल.

38) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने" कार्यालयाचा संपूर्ण परिसर त्यातील इमारती, स्वच्छतागृहे यांची पाहणी करुन त्यानुसार निविदा भरली आहे " अशा आशयाचे हमीपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

39) कंत्राटदार **<u>कंपनी/संस्थेमार्फत</u>** काम करणा–यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा न्यायालयावर राहणार नाही.

40) कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांच्यामार्फत दिल्या जाणा–या सेवा/सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यांत येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

41) कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रकमेच्या 5 टक्के बॅक गॅरंटी ही दोन वर्षाकरिता द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास, बॅक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा हक्क या कार्यालयास राहील. सेवाकराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवुन रद्द करण्यांत येईल आणि सदरचे काम इतर दुस–या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करुन घेतले जाईल.

42) अनामत रक्कम व टेंडर फी ऑनलाईन प्रणालीने स्विकृत होणार आहे.

43) हमीपत्र रू. 100/– चे गैर न्यायीक (Non-Judicial) बॉण्डवर दयावे लागेल.

44) आर्थिक लिफाफा प्रपत्र 1 व प्रपत्र 2 मध्ये दरपत्रक नोंदवून **BOQ अपलोड करावा.**

दिनांक :– / /2025

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
उस्मानाबाद.

हमीपत्र

(100/– रू. चे गैरन्यायीक बॉन्डवर)

मी, श्री.----------,प्रो.प्रा. ---------- एंटरप्रायजेस, पत्ता,----------,संस्थेचा नोंदणी कमांक ----------, संस्थेचा दूरध्वनी कमांक ----------, याद्वारे असे हमीपत्र लिहुन देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहीर करण्यांत आलेल्या विशेष जलदगती न्यायालय, उस्मानाबाद यांचे न्यायालयत चतुर्थ श्रेणी संवर्गातील शिपाई पदाची कामे करून घेणेसाठी दोन वर्षे कालावधीसाठी विशेष जलदगती न्यायालय, उस्मानाबाद यांचे न्यायालयात दोन शिपाई पदांची कर्तव्य पार पाडणेसाठी शासनमान्य कंत्राटदारामार्फत कंत्राटी सेवेने (आऊटसोर्सिंगद्वारे) करुन घ्यावयाच्या कामाकरिता दोन वर्ष कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी कामाची निविदा भरताना निविदा अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहिती करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच मी सदर कामासाठीच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करु.

आपल्या कार्यालयाने सदर सेवासाठी निर्गमित केलेला निर्देशन आमचे कंपनीस बंधनकारक राहतील.

ठिकाण :– उस्मानाबाद.

स्वाक्षरी/–

दिनांक :– / /2025

पुरवठादाराचे नांव पत्ता शिक्क्यासह.